टीप : वरील राखीव जागापैकी संचालक मंडळावर कोणत्याही जागेसाठी व्यक्ती निवडून आली नाही तर अशी जागा बँकेच्या निवडणूक लढविण्यास पात्र असेल क्रियाशिल सभासदांमधून कायदा कलम ७३ ब (३) नुसार नियुक्तीद्वारे भरली जाईल.

४) संचालक मंडळामधील २ जागा क्रियाशील महिला सभासदांसाठी कायदा कलम ७३ सी नुसार राखीव असेल.

टीप : क्रियाशील महिला सभासद सदर निवडणूक लढविण्यास पात्र राहील. जर अशा जागेवर महिला संचालक निवडून आली नाही तर कायद्याच्या कलम ७३(सी) २ नुसार दोन पात्र महिला संचालक नियुक्त करण्यात याव्यात.)

**४०) संचालक मंडळ सदस्यासाठीची पात्रता निकष –**

बँकेच्या ठेवीनुसार संचालक मंडळ निवडणूक लढविणेसाठी बँकेच्या क्रियाशिल सभासदांनी खालील पात्रता धारण करणे आवश्यक आहे.

बँकेच्या ठेवीनुसार संचालक मंडळ निवडणूक लढविणेसाठी बँकेच्या क्रियाशील सभासदांनी खालील पात्रता धारण करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | बँकेच्या ठेवी | किमान भाग भांडवल (रुपये) | किमान ठेव रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | रु.१०० कोटीपर्यंत | १०००० आणि | १००००० |
| २ | रु.१०० कोटीपेक्षा जास्त ते रु. ५०० कोटी पर्यंत | २५००० आणि | २००००० |
| ३ | रु. ५०० कोटी व त्यावरील | ३०००० आणि | ३००००० |

कायदा कलम ७३ ब व क नुसार निवडणूक लढविणाऱ्या क्रियाशील सभासदांची सर्वसाधारण सभासदांसाठी लागू असलेल्या पात्रता निकषांच्या ५०% इतकी किमान भाग भांडवल व ठेव रक्कम असणे आवश्यक आहे.

**४१) अध्यक्ष व उपाध्यक्ष :**

अ) संचालक मंडळ निवडणूकीनंतरच्या पहिल्या सभेमध्ये निवडून आलेल्या संचालकामधून ५ वर्षासाठी अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड करेल. ५ वर्षाचा कालावधी निवडणूकीच्या तारखेपासून मोजला जाईल. सदर सभेचे अध्यक्षस्थान कायदा व नियमांतील तरतूदीनुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने नेमलेला प्रतिनिधी भुषवेल.